दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ५ वे | अंक : २४ वा | मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स, धुळे

डेली सर्व्हिस - इंदौर, मुंबई, पुणे, अहमदाबाद, नागपूर, अमरावती, अकोला



लग्न समारंभासाठी व शैक्षणिक सहलीकरिता 2x2 आकर्षक बसेस भाडेतत्वावर मिळतील.

2x1 A/C स्लीपर कोच

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### अपात्र ठरवण्याचा अधिकार ठाकरेंना नाही

**मुंबई।** आमदार अपात्रतेची सुनावणी सध्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या समोर सुरु आहे. यावरुन विरोधक वारंवार राहुल नार्वेकर यांच्यावर टीका करत आहेत. इतकेच नाही तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेचे सर्व आमदार अपात्र ठरतील, अशी भविष्यवाणी देखील करत आहेत. यावरुन आता राहुल नार्वेकर यांनी आदित्य ठाकरे यांना प्रत्युत्तर दिले आहे. आमदार अपात्र ठरवण्याचा अधिकार आदित्य ठाकरे यांना नाही, त्यांनी केलेली भविष्यवाणी ही घटनेच्या तरतुदी विरोधात असल्याचेही राहुल नार्वेकर यांनी म्हटले आहे. घटनेतील तरतुदीनुसार विधानसभा अध्यक्ष म्हणून मी योग्य निर्णय घेणार आहे, असा विश्र्वास मी राज्यातील जनतेला देत असल्याचेही राहुल नार्वेकर यांनी म्हटले आहे.

### लायकी शब्द मागे घेतो: मनोज जरांगे

**मुंबई ।** लायकी नसलेल्यांच्या हाती काम करावं लागतंय असं आक्षेपार्ह विधान मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुण्यातील खराडी इथल्या सभेत केलं होतं. पण आता हे विधान अंगलट आल्यानं लायकी हा शब्द आपण मागे घेतो असं जरांगे यांनी जाहीर केलं आहे.

# दरोडेखोरांनी अपहरण केलेल्या तरुणीची सुटका; संशयित आरोपीही ताब्यात

**साक्री । प्रतिनिधी**



साक्री शहरामध्ये दरोडेखोरांनी सोने- चांदीच्या दागिन्यांसह तरुणीचे देखील अपहरण करून नेल्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली असता सदर तरुणी ही मध्यप्रदेश येथील शेंदवा या ठिकाणी पोलिसांना आढळून आली आहे. सेंधवा पोलिसांनी तरुणीला शिरपूर ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

साक्री शहरात २५ नोव्हेंबरच्या रात्री दरोडेखोरांनी घरात प्रवेश करत दरोडा टाकला होता. घरात एक महिला व तरुणी अशा दोघेच घरात होत्या. दरोडेखोरांना विरोध केला असता त्यांच्यात झटपट झाली. तरी देखील दरोडेखोरांनी सोने व चांदीचे दागिने लांबवीले होते. तर महिलेचे हातपाय बांधून तोंडात रुमाल कोंबून तरुणीला घेऊन फरार झाले होते. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी लागलीच तपासचक्रे फिरविण्यास सुरवात केली. दरोडेखोरांनी अपहरण केलेल्या तरुणीचा शोध घेतला. सदर तरुणी सेंधवा येथे आढळून आली. सेंधवा पोलिसांनी या तरुणीस शिरपूर ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केले असून शिरपूर ग्रामीणच्या पोलीस अधिकाऱ्यांनी तरुणीला साक्री पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेसंदर्भात पोलीस कसून तपास करीत असून काही संशयतांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तसेच तरुणीची देखील विचारपूस करून तिच्याकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सदर दरोडेखोरांचा शोध साक्री पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातर्फे घेण्यात येत आहे. सदर कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली साक्री पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्रीकृष्ण पारधी यांनी व त्यांचे सहकारी पोसई रोशन निकम, प्रसाद रौंदळ, पोहेकॉ संजय शिरसाठ, रामलाल अहिरे, बापू रायते, उमेश चव्हाण, विक्रांत देसले, मअसई आशा चव्हाण, मपोना इला गावित, शांतीलाल पाटील, पोना संदीप सावळे, पोकॉ तुषार जाधव, चेतन गोसावी, हेमंत सोनवणे, गुलाब शिंपी व स्टाफ यांनी केली.

### १२ तासांत छडा

अखेर सदर तरुणीचा अवघ्या १२ तासांत छडा लावण्यात साक्री पोलिसांना यश आले आहे. तिला सांगवी पोलिसांच्या मदतीने सेंधव्याहुन ताब्यात घेण्यात आले. सदर तरुणी सुखरुप असून ती भेदरलेल्या अवस्थेत होती. पोलिसांच्या या कामगिरीचे जनतेतून कौतुक होत आहे.

### सेंधव्यातून घेतले ताब्यात

साक्री पोलिसांत सदर गुन्ह्यांची नोंद झाल्यानंतर पोलिसांनी काल दिवसभर चारही दिशांना शोध सुरु ठेवला होता. तपास सुरु असतानाच अपहृत तरुणी निशा शेवाळे हिने दि २६ रात्री १० वाजेच्या सुमारास तिचे वडील मोठाभाऊ शेवाळे यांना फोन केला व मी सेंधवा (मध्यप्रदेश) येथे असल्याचे कळविले. त्यानुसार तिच्या वडीलांनी साक्री पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी लागलीच खात्री करुन सेंधवा पोलिसांशी संपर्क साधला. तसेच मध्यप्रदेश हद्दीवरील सांगवी पोलिसांनाही माहिती देण्यात आली. त्यानुसार सांगवी पोलिस ठाण्याचे पीएसआय संदीप पाटील, एपीआय जयेश खलाणे, पोकॉ पुरोहित, सुनिता पवार, पोहवा केदार बागुल, चालक मिर्झा यांचे पथक सेंधव्याला रवाना झाले. त्यांनी तरुणीला आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर आज मध्यरात्री साक्री पोलिसांनी सांगवी पोलिसांकडून तरुणीला ताब्यात घेतले. यावेळी तरुणीचे वडीलही सोबत होते. दरम्यान, सदर तरुणी सुखरुप असून पोलिसांकडून दरोडेखोरांचा शोध जारी असल्याची माहिती डीवायएसपी साजन सोनवणे यांनी पत्रपरिषदेत दिली.

# धुळ्यातील कार्तिक स्वामी मंदिरात दर्शनासाठी भक्तांची गर्दी



**धुळे । प्रतिनिधी**

कार्तिक पौर्णिमेनिमित्त शहरातील चाळीसगाव रोडवरील गिता जिनींग व प्रेसिंग कारखान्याच्या आवारातील श्री. कार्तिक स्वामींचे मंदिर उघडण्यात आले होते. भाविकांना व्यवस्थीत दर्शन घेता यावे, यासाठी मंदिर व्यवस्थापनाने युध्द पातळीवर तयारी केली होती. कार्तिक स्वामी मंदिरात दर्शनासाठी महिलांसह नागरिकांची रांग लागली होती. (दि. २७) रात्री उशीरापर्यंत भाविकांनी दर्शन घेतले. मंदिर सर्वांसाठी खुले करण्यात आले. हे मंदिर भाविकांसाठी वर्षातून एकदाच खुले होत असल्याने कार्तिक स्वामींचे दर्शन घेण्यासाठी महिला भाविकांसह नागरिकांची याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. मंदिरात सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

जुन्या पिढीतील या मंदिरात दरवर्षी भाविकांची प्रचंड गर्दी होत असल्याने आवश्यक त्या ठिकाणी प्रखर झोत फेकणारे दिवे, बॅरिकेटस लावण्यात आले होते. धुळे येथील चाळीसगाव रोड लगत गिता जिनींग व प्रेसिंग कारखाना आहे. पूर्वीच्या बिजेराम डेडराज ऑईल मिल आवारात शेठ पन्नालाल जीवनराम अग्रवाल यांनी संवत १९८२ श्रावण शुध्द अष्टमीच्या दिवशी श्री. महादेव मंदिराची स्थापना केली.

याच वेळी या जुन्या पध्दतीच्या घुमट आकाराच्या मंदिरात गणपती, शिवशंकर, पार्वती माता व हनुमानजी यांच्या आकर्षक अशा संगमरवरी मुर्तीसह श्री. कार्तिक स्वामीच्या मुर्तीची स्थापना झाली. तेव्हा पासून या ठिकाणी येणार्या भाविकांची नंतरच्या काळात श्रध्दा दृढ होत गेली. हे मंदिर जागृत असल्याची भावना निर्माण झाल्याने दरवर्षी या मंदिरात सतत महिला व पुरुषांची गर्दी वाढतच राहिली आहे. या पार्श्वभूमीवर मंदिराचे प्रमुख भरत अग्रवाल यांनी यंदाही भाविकांच्या सुविधेसाठी योग्य ती व्यवस्था करण्याचे प्रयत्न केले होते. मंदिराकडे जाणार्या रस्त्यांवर प्रखर झोत फेकणारे दिवे, रस्त्यांची डागडुगी व स्वच्छ करणे, मंदिराची विद्युत रोषणाई, परीसर स्वच्छता या कामावर भर देण्यात आला होता. संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात श्री. कार्तिक स्वामींचे मंदिर अपवादात्मक ठिकाणीच आहेत.

# दरोडेखोरांना जेरबंद करण्यात धुळे तालुका पोलिसांना यश

**धुळे । प्रतिनिधी**




धुळे-जळगाव रस्त्यावरील अमळनेर फाट्याजवळ स्वीफ्ट कारमधून आलेल्या तीन ते चार इसमांनी ट्रक अडविला. तसेच चालकास मारहाण करीत ट्रकसह २९ लाख ५० हजार २१५ रूपये किंमतीचा मुद्देमाल दरोडेखोरांनी लुटून नेला. या घटनेनंतर अवघ्या ५ तासांच्या आत या दरोडेखोरांना जेरबंद करण्यात धुळे तालुका पोलिसांना यश आले आहे.

दि. २६ नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास धुळेजळगाव रस्त्यावरील अमळनेर फाट्याजवळ जळगावकडून धुळे शहराकडे येणारा ट्रक (सीजे ०६/ जेडी १८८२) मागावुन आलेल्या कारमधील तीन ते चार जणांनी अडविला. यावेळी त्यांनी ट्रक चालकास व खलाशी यास शिवीगाळ करीत मारहाण केली. तसेच त्याच्या जवळील ४ हजार ३०० रूपयांची रोकड हिसकावित मुद्देमालासह ट्रक धुळे शहराकडे पळवुन नेला. या घटनेत १५ लाख रूपये किंमतीच्या ट्रकसह १४ लाख ४५ हजार ९१५ रूपये किंमतीचे एमएस पाईप, ४ हजार ३०० रूपये रोख असा एकूण २९ लाख ५० हजार २१५ रूपये किंमतीचा मुद्देमाल दरोडेखोरांनी लुटून नेला. त्यानंतर ट्रक चालक महम्मद ईरशाद कुरेशी रा.अबदालपूर, ता.सोराव, जि.जनपथ प्रयागराज उ.प्र. याने धुळे तालुका पोलीस ठाणे गाठुन घडलेला वृत्तांत कथन केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी गुन्हेगारांना शोधण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने धुळे तालुका पोलिसांनी तपासाला वेग दिला. त्यांनी नाकाबंदी मोहिम राबवून वाहनांची तपासणी केली. यात दोघा भामट्यांकडून चोरीचा ट्रक व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. शिवाय त्यांनी गुन्ह्यात वापरलेली स्वीफ्ट (एम. एच.३९/९५११) कारही मिळाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. सदरची कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे, डीवायएसपी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय प्रमोद पाटील, पोउनि अनिल महाजन, हवालदार प्रविण पाटील, नितीन चव्हाण, किशोर खैरनार, पोना कुणाल पानपाटील, उमेश पाटील, पोकॉ विशाल पाटील, पोना पवन मंडाले, गणेश बोरसे, पोकॉ प्रमोद पाटील, राहुल देवरे, रविंद्र सोनवणे, चालक रविंद्र राजपूत यांच्या पथकाने केली.

# मनमाडजवळ कार-कटेंनरमध्ये भीषण अपघात

### ५ युवक जागीच ठार

**नाशिक । प्रतिनिधी**

धार्मिक कार्यक्रमाला जातो म्हणून घराबाहेर पडलेलल्या पाच तरुणांवर काळाने घाला घातला आहे. मनमाडजवळ झालेल्या भीषण अपघातात या पाच तरुणांचा मृत्यू झाला. मृत पाचही जण नाशिकचे रहिवाशी आहेत. हा अपघात अत्यंत भीषण होता. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले आहेत. या अपघातामुळे वाहतूक कोंडीही झाली होती. मात्र, पोलिसांनी युद्ध पातळीवर ही वाहतूक कोंडी दूर केली.

आज सायंकाळी पाच ते साडे पाच वाजेच्या सुमारा हा अपघात झाला. मनमाडजवळील अनकवाडे रेल्वे उड्डाणपुलावर कार आणि कंटेनरमध्ये भीषण अपघात झाला. दोन्ही गाड्या समोरासमोर आल्याने कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघात इतका भीषण होता की उड्डाणपुलावरच कंटेनर उलटला होता. रोहित धनवटे, श्रेयस धनवटे, ललित सोनवणे, गणेश सोनवणे आणि प्रतीक नाईक हे पाच तरुण या अपघातात ठार झाले आहेत. हे पाचही जण नाशिकचे रहिवासी असल्याची माहिती मिळते. रोहित धनवटे, श्रेयस धनवटे, ललित सोनवणे, गणेश सोनवणे आणि प्रतीक नाईक हे पाचही तरुण मनमाड जवळच्या म्हसोबा देवस्थान येथील धार्मिक कार्यक्रमाला गेले होते. धार्मिक कार्यक्रमाला जाऊन संध्याकाळी परत येतो असं त्यांनी घरी सांगितलं होतं. पण येवला मार्गे नाशिकला येत असतानाच त्यांच्यावर काळाने घाला घातला. कंटेनरची जोरदार धडक बसल्याने कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. कंटेनरही पलटला. या अपघातात हे पाचही तरुण जागीच ठार झाले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांनी कारमधून मृतदेह बाहेर काढले.

# मराठा समाजाची बुलंद तोफ मनोज जरांगे पाटील ३ डिसेंबरला धुळ्यात

### फाशीपुल चौकात होणार सभा

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी घरावर तुळशीपत्र ठेवुन समाजाला एकजुट करणारे मराठा समाजाची बुलंद तोफ, मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील सध्या समाज एकत्रीकरणासाठी संपुर्ण महाराष्ट्रभर दौरे करत आहेत. धुळे जिल्ह्यात देखील आरक्षणाची मागणीसाठी आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाला उभारी देण्यासह कार्यकर्त्यांना पाठबळ देण्यासाठी मनोज जरांगे पाटील ३ डिसेबंर रोजी धुळे शहरात येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत शहरात जाहिर सभा भगतसिंग चौक, फाशीपुल या प्रस्तावित ठिकाणी होणार आहे.

या सभेच्या अनुषंगाने सकल मराठा समाजाच्या वतीने युध्द पातळीवर तयारी सुरु झाली आहे. मराठा समाजाची आरक्षणाची मागणी आता अंतीम टप्यावर आलेली आहे. अशी माहिती सकल मराठा समाजाच्या कोअर कमिटीतर्फे सोमवारी मराठा समाज मंगल कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. मनोज जरांगे पाटील यांनी धुळे जिल्ह्यात येण्यास होकार दर्शवला. मनोज जरांगे पाटील हे दि.३ डिसेंबर रोजी शहरात येणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत शहरात ३ डिसेंबर रोजी दुपारी १ वाजेला फाशीपुल भगतसिंग चौकात भव्य अशी जाहिर सभा आयोजीत करण्यात येणार आहे. मनोज जरांगे पाटील यांची आता राज्यात नव्हे तर देशभर ओळख आहे. सध्या राज्यभरात ते जेथे जात आहेत, त्या ठिकाणी भव्य स्वागत होत आहे. त्याच तोलामोलाचे स्वागत आणि सभा धुळे शहरात देखील करण्याचे नियोजन सकल मराठा समाजाने केलेले आहे. पत्रकार परिषदेला कोअर कमिटी सदस्य सुधाकर बेंद्रे, निंबा मराठे, साहेबराव देसाई, भानुदास बगदे, विनोद जगताप, संदीप पाटोळे, कैलास मराठे, दिपक रौंदळ, प्रफुल्ल माने, भैय्या शिंदे, मनोज ढवळे, शाम निरगुडे, वामन मोहिते तसेच जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मनोज गर्दे, सचिव सचिन बागुल यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.



### पत्रकार सुनील पाटीलांचे ५ हजारांचे योगदान

पत्रकार परिषद सुरु असताना सकल मराठा समाज कोअर कमिटी सदस्य, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा दैनिक नवराज्यचे संपादक सुनील पाटील यांनी जरांगे पाटील यांच्या सभेसाठी रोख ५ हजार रुपयांचे योगदान देऊन रक्कम कमिटीच्या स्वाधीन केली. यानिमित्त कोअर कमिटीतर्फे सुनील पाटील यांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला.

# दै.लक्ष महाराष्ट्रची दखल : त्या रोडरोमिओ, टवाळखोरांला पोलिसांनी दिली समज

शहरातील देवपूर बस्थानकात मुलींसमोर हिरोगिरी करणार्या व्हायरल टपोरीला पोलिसांनी शोधून काढत त्याची नशा उतरवली आहे. या कारवाईमुळे रोडरोमिओंचे धाबे दणाणले आहे. परंतु, सदर कारवाई सातत्याने होण्याची अपेक्षा पालकांनी व्यक्त केली आहे. तसेच या बाबत दैनिक लक्ष महाराष्ट्र ने देखील आवाज उठवला होता.

देवपुरातील बसस्थानकात विद्यार्थी आणि विद्यार्थीनींची मोठी वर्दळ असते. नेमकी हीच संधी साधून काही टवाळखोर या ठिकाणी गर्दी करत असतात. तसेच मोबाइलवर रिल शूट केली होती. यामध्ये दोन तरूण एका लाल रंगाच्या दुचाकीवरून येतात. एक जण दुचाकी घेवून पुढे निघून जातो. दुसरा एक मवाली खाली

उतरून अरे पैसा फेक नाचेंगी पिंकी...फुल टू लेट हे गाणे ओरडून म्हणतो. तसेच मुलींना बघून तो अंगलट येणारे हावभाव करतो. हे सारे कृत्य त्याच्या साथीदाराने मोबाईलमध्ये शूट केले होते. एकूण ३० सेकंदाच्या या व्हिडीओमुळे धुळ्यातील वातावरण पूर्णतः ढवळून निघाले आहे. मुलींची छेड काढणारे ते टपोरी कुठल्या धर्माचे, जाती-पंथाचे आहेत; इथवर लोकं शोध घेत आहे. परिणामी, यातून अप्रिय घटनेला आयते आमंत्रण मिळू शकते; म्हणून पोलीस विशेष दक्ष होते.





### समुपदेशन करण्याची गरज

केवळ कारवाईचा फास न आवळता असे कृत्य करणाऱ्या मुलांचे समुपदेशन करायला हवे.त्यांच्या कडून ही नकळत केवळ अज्ञानातून असे प्रकार घडत आहेत.हिरोगिरी करण्याच्या नादात आपण काही तरी गुन्हा करतोय याची त्यांनाही जाणीव नसतेच.अर्थात याची सुरुवात समाजापेक्षा घरातून होणे गरजेचे आहे.आपला मुलगा काय करतो याकडे पालकांनी दुर्लक्ष करणे योग्य नव्हे.अशी प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत.

### कान धरून उठाबशा

त्याला मुलींसमोर कान धरून उठबशा काढल्यात. तसेच यापुढे असे कृत्य करणार नसल्याची ग्वाही दिली. त्यामुळे हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. शहरातील शैक्षणिक संस्थांची संख्या आणि पोलिस पथकांचे मनुष्यबळ यामध्ये कमालीची विसंगती आहे. शिवाय एकाच वेळी ही पथके सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊ शकत नाहीत. त्यामुळे रोडरोमिओंचे फावत आहे.

### कारवाईचे स्वागत

पोलिसांनी काही तासांत रोडरोमियोंचा बंदोबस्त करण्याच्या हालचाली सुरू केल्या व त्याला बसस्थानकात नेले व मुलीची माफी मागायला लावली. तेथे त्याची सर्व हिरोगिरीची नशा उतरविण्यात आली. यामुळे मुली व महिलांमधील भीती निघून गेली आहे. नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

# गारपीट, अवकाळी पावसाने शेतपिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा

### मंत्री छगन भुजबळ यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यात रविवारी विविध भागात गारपीटीसह अवकाळी पाऊस झाला. यामुळे द्राक्ष पिकासह कांदा, टोमॅटो, फळबागा, पालेभाज्या आदि पीकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यात यावे असे आदेश राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना दिले आहेत. नाशिकमध्ये झालेल्या अवकाळी पावसाने जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेतीपिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. याबाबत मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क करून झालेल्या नुकसानीबाबत आढावा घेतला. तसेच कोणीही आपत्तीग्रस्त नुकसानीच्या मदतीपासून वंचित राहू नये यासाठी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागातील मंडलात सबंधित अधिकाऱ्यांना आदेशित करून तातडीने पंचनामे करून अहवाल शासनास सादर करण्यात यावा अशा सूचना ना. भुजबळ यांनी दिल्या आहेत.

## दबावाची खेळी?

काश्मीरला वेगळे करून नवा मुस्लिम देश बनविण्याच्या वल्गना पन्नूने केल्या. खलिस्तानचा विषारी विचार स्वतः पसरवताना, भारत मात्र आंतरराष्ट्रीय दहशतवाद वाढवत असल्याचे तर्कट त्याने मांडले आहे!

खलिस्तानचा समर्थक असलेला दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमुळे वादळ उठले. ते ताजे असतानाच गुरुपतवंतसिंग पन्नू याच्या हत्येच्या कथित प्रयत्नाबद्दल भारताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अमेरिकेने पन्नू प्रकरणात चिंता व्यक्त करीत भारताकडे निर्देश केला आहे. 'शीख फॉर जस्टिस' या न्यूयॉर्कमधील संघटनेचा पन्नू हा संस्थापक. खलिस्तानच्या नावाने भारतात फुटीची बीजे पेरण्याच्या कारस्थानात गुरुपतवंतसिंग पन्नू कायम आघाडीवर राहिला आहे. कॅनडा आणि अमेरिका या दोन्ही देशांचे नागरिकत्व त्याच्याकडे आहे. कॅनडात केवळ खलिस्तान समर्थकच राहतील, हिंदूंना तेथे स्थान नाही, असे फुत्कार त्यानेच सोडले. आपल्या भूमीत निज्जरची झालेली हत्या कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांना झोंबली. मात्र, कॅनडातील हिंदूंना आणि खलिस्तानशी देणेघेणे नसलेल्या शीख धर्मीयांना असुरक्षित करणार्या पन्नूची चिथावणी मात्र खटकली नाही. अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांचा हा दटप्पीपणा नवा नाही. 'एअर इंडिया'च्या विमानाचा घातपात घडविण्याची धमकी पन्नू याने उघडपणे दिली आहे. तीन वर्षांपूर्वी पन्नूला भारताने दहशतवादी घोषित केले. जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशाने कायदेशीर प्रक्रिया आणि पुरावे यावरून ज्याला दहशतवादी ठरविल, त्याचा अमेरिकेत आणि कॅनडात मुक्त संचार आहे. अन्य देशांच्या लोकशाहीला अशा फुटीरतावाद्यांमुळे बाधा येईल, हे लोकशाही आणि विचारस्वातंत्र्यावर प्रवचन देताना अमेरिकेला ठाऊक असायला हवे. आपल्या घरात पाळलेला साप केवळ शेजार्यालाच चावेल, या भ्रमात राहू नये, असे मोठ्या परखडपणे अमेरिकेने एकेकाळी पाकिस्तानला सुनावले होते. पन्नू आणि पिलावळीच्या रूपाने आपण कोणाला आणि कशासाठी सांभाळून ठेवले आहे? यावर अमेरिका बोलणार नाही आणि कॅनडाचीही ती हिम्मत होणार नाही. कॅनडाच्या नागरिकांसाठी भारताने दोन महिन्यांच्या स्थगितीनंतर पुन्हा व्हिसा सेवा सुरू केली. दोन्ही देशांमधील तणाव पूर्णपणे निवळलेला नाही. याचवेळी पन्नू याच्या हत्येच्या कथित प्रयत्नांबद्दल अमेरिका आणि ब्रिटनमधील माध्यमांमधून माहिती प्रसिद्ध झाली.

स्वतंत्र भूमिकाच योग्य

अमेरिकेच्या भूमीवर पन्नू याची हत्या करण्याचा कट अमेरिकेने उधळून लावला, असे सांगितले जात आहे. याबाबत भारताकडे बोट दाखविण्यात आले आणि चिंता व्यक्त करण्यात आली. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने, आम्ही गंभीर दखल घेतली आहे, अशी प्रतिक्रिया दिली. निज्जर प्रकरणात अमेरिकेचा कल कॅनडाच्या बाजूने आहे. किंबहुना, कॅनडाला निज्जर प्रकरणात भारताचा तथाकथित सहभाग असलेली माहितीच मुळात अमेरिकेच्या गुप्तचर संघटनांनी पुरवल्याचे दिसत आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारे फुटीरतावादी पाकिस्तान, कॅनडा, अमेरिका अथवा ब्रिटनमध्ये असले, तरी अन्य देशांत या पद्धतीने कारवाईची भारताची भूमिका नव्हती आणि नाही. जागतिक पटलावर भारताचे स्थान उंचावत आहे. अमेरिकेला चीनचा विस्तारवाद रोखण्यासाठी, त्याचबरोबर रशियाचा जागतिक प्रभाव मर्यादित ठेवण्यासाठी भारताची मदत हवी आहे. दुसर्या बाजूला आपल्या अटीनुसारच सहकार्याची पुढील वाटचाल व्हावी, ही अमेरिकेची इच्छा लपून राहिलेली नाही. भारत यासाठी कदापि तयार होणार नाही. अशावेळी भारतावर दडपण आणण्यासाठी आणि भारताच्या स्वच्छ प्रतिमेवर डाग लावण्याची संधी म्हणून पन्नू प्रकरणाचा वापर होत असणे शक्य आहे. ज्यावेळी स्वतःचे हितसंबंध असतात त्यावेळी महासत्तेला मानवी मूल्य, लोकशाही वगैरे तत्त्वांचा विसर पडतो. स्वहिताशी कोणतीही तडजोड न करता अलीकडच्या काळात भारताची वाटचाल सुरू आहे. पाश्चात्त्यांचा दबाव झुगारून युक्रेन युद्धात भारताने स्वतंत्र भूमिका घेतली. यापुढे ती कायम ठेवतानाच देशाच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणार्या पन्नू अथवा हाफिज सईदसारख्या घटकांबद्दल आक्रमक धोरण स्वीकारणेच योग्य राहील.

# पर्यटनातील अडवणूक आणि फसवणूक

मानवेंद्र रॉय यांनी चार जणांसाठी दुबईची टूर बुक केली होती. त्यासाठी त्यांनी टूर पॅकेजचे तब्बल २,०६,९५९/- रु. भरले होते. हे आरक्षण त्यांनी ईमेलद्वारे 'मेक माय ट्रिप'कडे १९ सप्टेंबर २०१५ रोजी केले होते. त्यानुसार ईमेलद्वारे 'मेक माय ट्रिप'ने प्रवासाचा कार्यक्रम पाठवला. त्यात हा कार्यक्रम तात्पुरता असल्याचे म्हटले होते. असे असले तरी त्या दुबईमधील पर्यटन स्थळ दर्शन असल्याचे म्हटले होते. दौर्‍याच्या फक्त तीन दिवस आधी मानवेंद्र रॉय विमानाची तिकिटे घेण्यासाठी कार्यालयात गेले. त्यावेळी कोणतीही पूर्व सूचना न देता प्रवासाचा हा कार्यक्रम बदलला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. नवीन कार्यक्रमानुसार स्थल दर्शन त्यात नव्हते. केवळ हवाई तिकीट आणि हॉटेल आरक्षणासाठी शुल्क आकारले गेले होते.

रागाच्या भरात किंवा नाईलाजाने कार्यक्रम रद्द करावा, तर प्रवासाला फक्त तीन दिवस उरले होते. कंपनीच्या नियमानुसार भरलेले सर्व शुल्क वाया जाण्याची भीती. ते जप्त झाले असते. अशा वेळेला रॉय यांनी नाईलाजाने तिकिटे घेतली आणि प्रवासाला सुरुवात केली. दुबईमध्ये जेवण आणि स्थल दर्शनासाठी पदरचे जास्तीचे पैसे भरावे लागले. भारतात परत आल्यावर त्यांनी राज्य आयोगाकडे तक्रार केली. सुनावणीच्या वेळी 'मेक माय ट्रिप'ने म्हटले की, बुकिंगच्या वेळेस आम्ही हा तात्पुरता बनवलेला प्रवासाचा कार्यक्रम आहे असे स्पष्टपणे सांगितले होते. रॉय यांनी तरीसुद्धा का कार्यक्रम स्वीकारला आणि प्रवास केला. त्यामुळे त्यांना आम्ही कोणतीही नुकसान भरपाई देणे लागत नाही. राज्य आयोगाने हा मुद्दा चुकीचा असल्याचे म्हटले आणि रॉय यांना एक लाख दहा हजार रुपये झालेल्या मनस्तापासाठी देण्यास फर्मावले.

'मेक माय ट्रिप'ला हा आदेश मान्य न झाल्याने त्यांनी राष्ट्रीय आयोगाकडे अपील केले. राष्ट्रीय



आयोगाने पुढील मुद्दे विचारात घेतले. नियमानुसार १० दिवसांऐवजी ३ दिवस अगोदर प्रवासाचा कार्यक्रम बदलल्याचे सांगितले. त्यामुळे सगळेच पैसे वाया जातील या काळजीपोटी नाईलाजाने बदल स्वीकारावा लागला. जरी सुरुवातीला कार्यक्रम 'तात्पुरता' असल्याचे म्हटले असले तरी त्याचा अवाजवी फायदा घेऊन असा मोठा बदल करणे म्हणजे अनुचित व्यापारी प्रथा आहे. 'तात्पुरता' याचा अर्थ केवळ अनियंत्रित परिस्थितीत नाईलाजास्तव केलेला बदल असा घेतला पाहिजे. शेवटच्या क्षणी अशा प्रकारे टूर पॅकेज बदलणे म्हणजे सेवेतील त्रुटी असे मानले पाहिजे. टूरची संपूर्ण रक्कम मिळाल्यानंतर आणि ग्राहकांना टूर रद्द करण्याचा कोणताही पर्याय शिल्लक न ठेवता, ग्राहकाला धमकावून त्यांची संपूर्ण रक्कम जप्त करणे हे अन्यायकारक आणि फसवेगिरीचे उदाहरण आहे. त्यामुळे राज्य आयोगाचा आदेश कायम ठेवला गेला आणि झालेल्या मनस्तापासाठी रॉय यांना १,१०,०००/- रु. देण्याचे निर्देश दिले गेले.

एक माणूस दिल्लीतील ताज महाल हॉटेलमध्ये जेवण्यासाठी गेला. गाडी प्रवेशद्वारासमोर उभी करून त्याने गाडीची चावी संबंधित पार्किंग मॅनकडे सुपूर्द केली. जेऊन झाल्यावर बाहेर आल्यावर तेथील दारवानाने सांगितले की, तुमची गाडी अज्ञात चोरट्याने पळवून नेली आहे. आम्ही चोरट्याला पकडण्याचा खूप प्रयत्न केला पण त्याने पळ काढला. कारमालकाने तातडीने हॉटेलच्या सुरक्षा कक्षाकडे धाव घेत सुरक्षा अधिकार्‍याशी संपर्क साधला. हॉटेलने पोलिसात गाडीच्या चोरीची तक्रार दिली. पोलिसांनी शोधाशोध केली पण गाडी सापडत नसल्याचा अहवाल दिला. कारमालकाने युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या कंपनीत गाडीचा विमा काढलेला होता. त्यानुसार दावा दाखल केला. सर्वेक्षकाची नियुक्ती करण्यात आली. त्याने सर्व कागदपत्रांची पडताळणी करून दावा योग्य असल्याचे म्हटले. नुकसान भरपाईची म्हणून चेकद्वारे २,८०,००० रु. हॉटेलने कारमालकाला द्यावे अशी विनंती केली. पण हॉटेलने त्यास नकार दिला.

त्यामुळे कारमालकाने राज्य आयोगाकडे धाव घेत दावा दाखल केला. राज्य आयोगाने तक्रार योग्य असल्याचे मान्य करत हॉटेलला पैसे देण्यास सांगितले; परंतु निर्णय मान्य न झाल्याने तक्रार राष्ट्रीय आयोगात पोहोचली. येथे मुद्दा असा उपस्थित करण्यात आला की, झालेल्या नुकसानीस हॉटेल जबाबदार आहे की नाही? आयोगाने म्हटले की गाडी मालकाने चावीसकट गाडी हॉटेलच्या ताब्यात दिली होती. केवळ पार्किंग तिकिटावर लिहिले म्हणून हॉटेल आपली जबाबदारी झटकू शकत नाही. त्यांनी गाडी अनामत असल्याप्रमाणे सांभाळायला हवी होती. गाडी मालकाने हॉटेलमध्ये जेवण घेतले होते म्हणजे गाडी मालक हॉटेलचा ग्राहक होता. हॉटेलला हे मान्य आहे. इन्शुरन्स कंपनीने गाडी मालकाला नुकसानभरपाई दिली आहे. त्यामुळे राज्य आयोगाचा निर्णय सुधारून हॉटेलने गाडी मालकाला २८०००० रु. ९ टक्के व्याजासकट देण्याचा निर्णय दिला.

पर्यटनासाठी घराच्या बाहेर पडल्यावर असे छोटे-मोठे धक्के ग्राहकांना बसतच असतात. तरीही गांगरून न जाता ग्राहकांनी योग्य त्या प्लॅटफॉर्मवर या विरुद्ध आवाज उठवण्याचे काम केलेच पाहिजे. ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकांना हक्क प्रदान केले आहेत. एकाच नाण्याच्या दुसर्‍या बाजूप्रमाणे त्यापाठोपाठ ग्राहकांची काही कर्तव्येही आहेत. 'आवश्यक कृती' हे त्यापैकीच एक आहे. त्यास जागून आपल्या तक्रारीचे निवारण करून घेतले पाहिजे.

**मंगला गाडगीळ: मुंबई ग्राहक पंचायत**

# देशाच्या अर्थव्यवस्थेला झळाळी

दिवाळीच्या काळात अर्थव्यवस्थेने वेग घेणे हे आशादायक चिन्ह आहे. विविध दलाली फंडांच्या अंदाजानुसार, संवत्सर २०८० मध्ये कंपन्यांची कामगिरी उत्तम होईल. वास्तविक, अमेरिकी मध्यवर्ती बँकेला महागाई नियंत्रणात येण्याबाबत अजूनही विश्वास नाही. या चिंतेवर मात करत भारतीय शेअर बाजारात तेजीवाले जोरात आहेत. देशांतर्गत आघाडीवर महागाई कमी होण्याची शक्यता असून विकासदर देखील वाढेल, असा होरा आहे.

शेअर बाजारामध्ये अलिकडच्या काळात दिवाळीच्या मुहूर्ताच्या सौद्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला आणि शेअर बाजार निर्देशांकामध्येही ३५४ अंशांची वाढ दिसली. यंदा एकूणच बाजारपेठांमध्ये टेलिव्हिजन संच, फ्रीज, एसी, कूलर, मोबाइल, कार्स, मोटरसायकल्स यांची तूफान खरेदी झाली. सोन्या-चांदीच्या बाजारपेठेचाही अक्षरशः जल्लोष होता. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हे अत्यंत सकारात्मक असे वातावरण आहे. कोरोनानंतर अर्थव्यवस्थेने गती घेतली असून हे आशादायक चिन्ह आहे. विविध दलाली फंडांच्या अंदाजानुसार, संवत्सर २०८० मध्ये कंपन्यांची कामगिरी उत्तम होईल, अशी अपेक्षा आहे. वास्तविक, अमेरिकी मध्यवर्ती बँकेला महागाई नियंत्रणात येण्याबाबत अजूनही विश्वास नाही. त्याचे प्रतिबिंब जगभरातील भांडवली बाजारांवर उमटले असले, तरी या चिंतेवर मात करत भारतीय शेअर बाजारात तेजीवाले जोरात आहेत. देशांतर्गत आघाडीवर महागाई कमी होण्याची शक्यता असून विकासदर देखील वाढेल, असा होरा आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीने सप्टेंबरअखेरच्या तिमाहीमध्ये ७,९२५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला. निव्वळ नफ्यात घसरण झाली असली, तरी गुंतवणुकीतून मिळणारे निव्वळ उत्पन्न सुमारे ८४ हजार कोटी रुपयांवरून वाढून ९३ हजार कोटी रुपयांवर पोहोचले. एलआयसीचे सॉल्व्हन्सी मार्जिनही वाढ दर्शवत आहे. देशाचे निव्वळ प्रत्यक्ष करसंकलन नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत वार्षिक तुलनेत २२ टक्क्यांनी वाढून दहा लाख साठ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. हे प्रमाण संपूर्ण वर्षासाठी निश्चित करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय उद्दिष्टाच्या ५८ टक्के इतके आहे.

यंदा वैयक्तिक प्राप्तिकर संकलन वाढल्याने एकूण करमहसूल वृद्धी दर्शवत आहे. उद्योग क्षेत्रातून होणारे करसंकलन १२ टक्क्यांनी वाढले आहे, तर वैयक्तिक प्राप्तिकर संकलन ३१ टक्क्यांनी विस्तारले आहे. स्थूल आधारावर कंपनी आणि वैयक्तिक प्राप्तिकर समाविष्ट असलेल्या प्रत्यक्ष करातून मिळणार्या कर संकलनात १७ टक्क्यांची वाढ होऊन ते १२ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचले आहे. प्रत्यक्ष करसंकलन गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील निव्वळ संकलनापेक्षा २१ टक्के अधिक आहे. याचबरोबर मागील महिन्यात करदात्यांना अंदाजे २७ हजार कोटी रुपयांचा परतावा देण्यात आला. २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात सुमारे १८ लाख कोटी रुपयांचे प्रत्यक्ष कर संकलनाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले, जे गेल्या आर्थिक वर्षात जमा झालेल्या उत्पन्नापेक्षा पावणेदहा टक्क्यांनी जास्त आहे. प्रत्यक्ष करात वाढ होणे, याचा अर्थ वैयक्तिक करदात्यांचे उत्पन्न वाढले आहे. त्याचप्रमाणे उद्योग क्षेत्राची प्राप्तीदेखील वाढली आहे. शिवाय करप्रणाली जितकी सुगम होते, तितकी वसुली अधिक होत असते. अप्रत्यक्ष करांचा फटका गरिबांना अधिक बसतो, तर प्रत्यक्ष कर हे अधिक न्यायपूर्ण असतात, असे मानले जाते, हे लक्षात ठेवले पाहिजे.

देशातील निर्मितीक्षेत्राची कामगिरी आणि उत्पादनवृद्धीचे प्रतिबिंब ज्यात पडते, त्या आयआयपी किंवा औद्योगिक उत्पादन निर्देशांकाने सप्टेंबर २०२३ अखेर ५.८ टक्क्यांच्या पुढे मजल मारली. याचा अर्थ औद्योगिक क्षेत्र गतिमान बनले आहे. गेल्या वर्षी, म्हणजे सप्टेंबर २०२२ मध्ये ३.३ टक्के वाढ नोंदवली गेली होती. मात्र ऑगस्ट महिन्याच्या तुलनेत सप्टेंबर महिन्यात औद्योगिक उत्पादन दरात मोठी घट झाली आहे. ऑगस्ट महिन्यात तो १०.३ टक्के नोंदवला गेला होता. तरीदेखील गेल्या वर्षाच्या तुलनेत प्रगतीचा वेग चांगलाच आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार निर्मितीक्षेत्राने सप्टेंबर महिन्यात ४.५ टक्के वाढ नोंदवली आहे. खाणकाम तसेच वीजनिर्मिती क्षेत्राने अनुक्रमे ११.५ टक्के आणि ९.९ टक्के दराने वृद्धी साधली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षामधील एप्रिल-सप्टेंबर या कालावधीत औद्योगिक उत्पादनातील वाढ सहा टक्के आहे. ही वाढ एका वर्षापूर्वीच्या याच कालावधीतील ७.१ टक्क्यांवरून खाली आली आहे. औद्योगिक निर्देशांकाला कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत खास महत्त्व असते. त्यावरून कारखान्याची प्रगतीची दिशा कळू शकते.


औद्योगिक क्षेत्रात भरभराट झाली, तर रोजगार विकासही चांगल्या पद्धतीने होतो आणि कामगारांच्या हातात पैसे खुळखुळायला लागले तर शेतमालाची खरेदीही चांगली होते. तसेच त्याचा ग्रामीण बाजारपेठेवर अनुकूल परिणाम होत असतो. मात्र मध्यम व मोठ्या कंपन्यांप्रमाणेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंपन्यांची स्थितीही उत्तम असल्यास अर्थव्यवस्था सुदृढ असल्याचे मानले जाते. परंतु सूक्ष्म, लघु आणि मध्यम कंपन्याच्या क्षेत्राकडे जेवढे लक्ष केंद्रित केले पाहिजे, तेवढे ते दिले जात नाही. जागतिक पातळीवर विचार करायचा झाल्यास चीनच्या थेट परकीय गुंतवणुकीत घट झाली असून भारतात त्याचा फायदा मिळू शकतो. चीनमधील थेट परकीय गुंतवणूक १९९८ नंतर पहिल्यांदाच नकारात्मक पातळीवर घसरली असून यंदाच्या तिसर्या तिमाहीमध्ये ती शंभर अब्ज डॉलरवरून ११ अब्ज डॉलरपर्यंत घसरली आहे. म्हणूनच देशातील थेट परकीय गुंतवणुकीत किंवा एफडीआयमध्ये घसरण होत असली तरी पुढील काळात परदेशी कंपन्या भारतात प्रकल्पांच्या उभारणीसाठी गुंतवणूक करतील अशी चिन्हे आहेत. परदेशी कंपन्यांकडून प्रकल्प उभारणीसाठी पसंती असलेल्या देशांमध्ये युनोच्या व्यापार व विकास परिषदेने भारताला आघाडीच्या तीन देशांमध्ये स्थान दिले आहे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक पातळीवरून नवीन गुंतवणूक आकर्षित करण्यात भारत अधिकाधिक यशस्वी ठरत आहे, हे सुचिन्हच म्हणावे लागेल.

२०२० च्या साथीच्या वर्षामुळे जागतिक स्तरावर आणि भारतातही जीडीपी वाढीचा नकारात्मक दर पहायला मिळाला होता. तथापि, भारताच्या विकासदरातील पुनरुज्जीवन हे मुख्यत्वे उपभोग खर्चाच्या पुनरुज्जीवनास कारणीभूत ठरू शकते. २०२० मध्ये वस्तुंचा खप ४.५ टक्क्यांनी घसरला, तर २०२१ मध्ये तो जवळपास १०.५ टक्क्यांनी वाढला. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे, की १९९१ पासून भारतीय वृद्धीगाथा मोठ्या प्रमाणात उपभोगावर आधारित आहे. ही उपभोगचालित वाढ असून धोरणाद्वारे प्रोत्साहनातून आलेली बरकत नाही. आजच्या जागतिक मंदीच्या परिस्थितीतही भारत वेगवान विकासवाटेवर आहे. त्याला स्मार्ट महागाई नियंत्रण उपायांनी पुरेसा पाठिंबा दिला आहे. विशेषत: अत्याधुनिक मार्केट इंटेलिजन्सद्वारे वस्तूंच्या किंमतींच्या बाबतीत. यामध्ये कच्चे तेल आणि खाद्यपदार्थांची किफायतशीर खरेदीदेखील समाविष्ट आहे. अमेरिका-चीन व्यापार संघर्ष आणि साथीच्या रोगामुळे युक्रेन-रशिया युद्धामुळे जागतिक पुरवठा साखळीत व्यत्यय आल्यामुळे पाश्चात्य कंपन्यांना आर्थिक आणि भू-राजकीय जोखमींचे व्यवस्थापन करण्यासाठी इतर गंतव्यस्थानांवर गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले आहे. भारताची तरुण लोकसंख्या (३० वर्षांखालील ५२ टक्के) चीनच्या (४० टक्के) ला मागे टाकते. त्यामुळे तिचा आर्थिक वाढीसाठी वापर, बचत आणि गुंतवणूक वाढवण्यात फायदा होतो. २०२३ मध्ये भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचे राष्ट्र म्हणून उदयास आले. वाढत्या दरडोई उत्पन्नासह (सात टक्के वार्षिक वाढ), भारताने एक जबरदस्त उत्पादन बाजारपेठ सादर केली आहे आणि थेट परकीय गुंतवणुकीला आकर्षित केले आहे.

चीनसह अन्य प्रमुख अर्थव्यवस्था असलेल्या देशांच्या तुलनेत भारताचे श्रम आणि भांडवली खर्च कमी आहेत. भारतामध्ये मोठ्या प्रमाणात स्वस्त आणि कुशल कामगारांचे मानवी भांडवल उपलब्ध आहे. उत्पादन आणि निर्यातवाढीसाठी भारत त्याचा उपयोग करू शकला आहे. त्याच्या उत्पादन स्केलसह भारत इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टरमध्ये महत्त्वपूर्ण घटक बनू शकतो. राष्ट्रीय पायाभूत सुविधेच्या क्षेत्रात मजबूत गुंतवणूक केल्याने उत्पादन खर्च कमी होईल, तसेच वाहतुकीची कार्यक्षमता वाढेल. पर्यायाने एकूण व्यावसायिक वातावरणाला त्याचा फायदा होईल. स्वदेशी तंत्रज्ञान आणि इंग्रजी भाषेतील प्रावीण्य भारताला डिजिटल क्षमतांमध्ये पुढे ठेवते. दुसरी अधिकृत भाषा म्हणून इंग्रजी ही उत्तर अमेरिकन आणि युरोपियन ग्राहकांशी संवाद साधण्याची सुविधा देते. त्यामुळे भारताला संवादाचा अधिक फायदा होतो. या सर्व बाबी अर्थव्यवस्थेच्या सकारात्मक वाढीसाठी पूरक आहेत.

**- हेमंत देसाई : ज्येष्ठ पत्रकार**

## शब्दकोडे-२४४



**आडवे शब्द**

१. दिवसाची चाकोरी (ला.) ५. तडीपार ७. बहुदा उसने बळ ९. जुगाराचा एक प्रकार १०. अमावस्या ११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग १२. गंध १४. नजरकैद, अटक १६. योग्य, बरोबर १८. संताप १९. रूक्ष, कोरडे २२. सेवक २३. मृत्यू नसलेला २४. बातमी २५. उत्तरदायित्व, जोखीम २७. किरकोळ सामान ३०. भार, बोजा ३१. शेवटचा पांडव ३३. गाडीचे छत ३५. विजार ३६. वरपांगी ३८. वटवट, त्रास ३९. पदर ४१. दरवाजा ४२. आरोप ४३. सवय, उत्तर दिशा ४४. देवाण-घेवाण ४८. आस, अक्ष ४९. बडबड्या ५०. प्रेत ५२. निवासस्थान ५३. सर्वांना सारखे प्रमाण ५५. रेचक ५६. वागणूक ५७. किंमत ५८. नवीन आलेला ६०. लहानच्या विरुद्ध ६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ ६२. दिवसभराचे एकूण काम ६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला? ६६. भांडण ६७. मस्ती, जोम ६८. पोते शिवण्याची जाड सुई ६९. खोदकाम ७१. पोपट ७३. सैन्याचा दाणागोटा ७४. वाळवी, उणीव ७५. अनौपचारिक सहभोजन

**उभे शब्द**

१. रम्य २. बाजार ३. बंगाली रुपाया ४. घर सोडून निघून जाणे ५. मावळ्यांची युद्धातील घोषणा ६. मर्यादा ७. स्थिती, दशा ८. वस्त्र, कापड ११. मध्यम प्रमाण १३. '--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का' १५. सह, सोबत १७. थापा मारणारा २०. आवाजातील घोगरेणा २१. सज्ज २२. मोठा भाऊ २४. धडपड, प्रयत्न २५. आजूबाजूला २६. पावाचा गोल प्रकार २८. धडक २९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा ३१. संतोष आनंद ३२. आशीर्वाद ३४. अंदाज, तर्क ३७. नवरदेव ४०. चटकन ४२. सजावट ४४. अवडंबर, धैर्य ४५. उंबरठा ४६. सचिव, मुख्य ४७. किंमत ४८. अंब्याचे मिष्टान्न ४९. चणचण, न्यूनता ५१. मुलगा किंवा मुलगी ५३. चांगली वागणूक ५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ. ५५. धनको ५९. मरेपर्यंत ६०. मोजणी ६१. हास्याचे पीक ६३. सुसर ६४. उत्सव ६५. फुलातील पुंकेसर ७०. पुरुष ७२. वैताग (ला.)

## शब्दकोडे-२४३ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.सुरवंट ४.कडेकपार ७.मधुमक्षिका १०.चवदार ११.लाल १२.वाद १३.पोरकट १५.वासा १७.नजरानजर २०.हेमा २१.वीर २३.वडा २४.धनी २५.तमा २६.मसलत २८.वांड २९.कोमल ३१.कांचनमृग ३३.रया ३४.कस ३६.हरीत ३७.गरजवंत ३९.ग ४०.सागर ४२.तनया ४३.गरीब ४५.चावी ४६.जबरदस्त ४८.जन्म ४९.तळमळणे ५१.साव ५३.समरभूमी ५५.कमळ ५६.सुकट बोंबिल ६०.रजा ६१.मामी ६२.जनरीत ६४.तमासगीर ६७.जनावर ६९.रस ७१.पात ७२.रजा ७३.वा ७५.काळ ७६.आंबहळद ७७.गाणे ७८.सनदशीर ८१.चारा ८३.सलगी ८४.गणेशस्तुती ८५.विपरीत

**उभे उत्तर**

२.वंचक ३.टवटवीत ४.करवा ५.कला ६.पालन ७.मदन ८.मखर ९.कानोकानी १२.वारा १३.पोहे १४.रमाधान १६.सावधान १८.जवस १९.जड २२.रमाकांत २४.धडक २६.मगर २७.तरतरीत २९.कोळसा ३०.लहरबहर ३२.मृगया ३५.सजविणे ३८.वंग ४१.गज ४२.तस्त ४४.बळकट ४५.चाळ ४७.दशमी ४८.जवळजवळ ५०.कसरत ५१.साम ५२.असुरी ५४.मजा मारणे ५५.कमीज ५७.कतरबेत ५८.बोंड ५९.लज्जत ६३.नर ६५.सजा ६६.रवानगी ६८.नाकारणे ७०.सह ७१.पादचारी ७४.रद ७७.गार ७८.सल ७९.शीग ८०.वास्तु ८२.रात

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### पोलीस पाटील आणि कोतवाल पदासाठी १० डिसेंबरला परीक्षा

**मालेगाव ।** तालुक्यातील पोलीस पाटील व कोतवाल पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची रिक्तपद भरतीसाठीची परीक्षा १० डिसेंबरला होणार आहे. पूर्वी ही परीक्षा २२ ऑक्टोबरला होणार होती. भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना सरकारच्या निर्देशानुसार स्थगित करण्यात आली होती. 'पेसा' कार्यक्षेत्राबाहेरील क्षेत्रासाठी पदभरतीस निर्बंध नसल्याने पोलीस पाटील व कोतवाल रिक्त पदांसाठी १० डिसेंबरला परीक्षा घेण्यात येणार आहे. पोलीस पाटील पदासाठी मालेगाव उपविभाग तसेच कोतवाल पदासाठी मालेगाव तालुक्यातील अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी १ डिसेंबरपासून https://nashik.ppbharti.in या संकेतस्थळावर परीक्षा प्रवेशपत्र उपलब्ध करण्यात येणार आहेत. उमेदवारांनी या संकेतस्थळावरून परीक्षा प्रवेशपत्र उपलब्ध करून घ्यावेत. परीक्षा प्रवेशपत्र डाउनलोड करताना काही अडचण येत असल्यास तहसील कार्यालयातील मदत कक्षाशी संपर्क साधावा.

## निधन वार्ता

### राजेंद्र पवार

**धुळे ।** शहरातील मोतीनगर येथील रहिवाशी राजेंद्र भिला पवार (राजू पवार) वय ६५ वर्षे यांचे दिर्घआजाराने काल (दि.२७ नोव्हेंबर २०२३) रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा २८ रोजी सकाळी १० वाजता नकाणे येथून राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, भाऊ असा परिवार आहे.

# मराठा समाजाला आरक्षण देण्याचा आमचा विरोध नाही, तर जाळ पोळ करणाऱ्या झुंड शाहीला आमचा विरोध - मंत्री भुजबळ

## हिंगोलीतील ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभेत लाखो ओबीसी बांधवांचा जनसागर

### शिंदे समिती बरखास्त करा, देण्यात आलेले कुणबी प्रमाणपत्र तातडीने रद्द करा - मंत्री भुजबळ

**हिंगोली । प्रतिनिधी**





मराठा समाजाला आरक्षण देण्याचा आमचा विरोध नाही, तर जाळ पोळ करणाऱ्या झुंड शाहीला आमचा विरोध आहे असे मत व्यक्त करत शिंदे समिती बरखास्त करून, दिलेले खोटे कुणबी प्रमाणपत्र तातडीने रद्द करण्यात यावे अशी मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री व ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी केली.

ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचावासाठी तसेच या बांधवांच्या न्याय हक्कासाठी काल हिंगोली येथील रामलीला मैदानावर राज्यातील ओबीसी नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत 'ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभा' पार पाडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी लाखोंच्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते.

यावेळी ओबीसी जनमोर्चाचे नेते माजी आमदार प्रकाश शेंडगे, माजी मंत्री आ.महादेव जानकर, खा. रामदास तडस, ओबीसी महासंघाचे डॉ.बबनराव तायवाडे, भटक्या विमुक्तांचे नेते प्रा.लक्ष्मण गायकवाड, आ. राजेश राठोड, आ. डॉ.प्रज्ञा सातव, मुस्लिम ओबीसी संघाचे शब्बीर अन्सारी, प्रा.टी.पी.मुंडे, माजी खासदार समीर भुजबळ, डॉ.बी.डी.चव्हाण, माजी आमदार रामराव वडकुते, प्रकाश राठोड, ड.सचिन नाईक यांच्यासह सकल ओबीसी, भटके विमुक्त जाती, एसबीसी आणि अल्पसंख्याक समाज व हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकारी व ओबीसी बांधव लाखोंच्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, जीवाची पर्वा न करता अनेक आंदोलने केली आहे आणि यापुढेही आंदोलने करण्याबाबत आपल्याला चिंता नाही. तुम्ही १७ सभा घेतल्या तेव्हा आम्ही केवळ एकच सभा घेतली. आमचं दु:ख मांडताना आम्ही कुठलीही जाळपोळ केली नाही दगडफेक केली नाही. मात्र तुम्ही अनेकांची घर जाळली दगडफेक केली. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा आमचा विरोध नाही, तर जाळ पोळ करणाऱ्या झुंड शाहीला आमचा विरोध आहे. असे सांगत पेटवायला अक्कल लागत नाही, पटवायला अक्कल लागते. जाळायला अक्कल लागत नाही, जुळवायला अक्कल लागते. मोडायला अक्कल लागत नाही, घडवायला अक्कल लागते अशी टीका त्यांनी यावेळी केली.

ते म्हणाले की, ज्या शिव्या कोणी वाचू शकत नाहीत, अशा शिव्या गेले दोन महिने मी आणि माझे कुटुंब सातत्याने ऐकत आलोय. ओबीसींच्या न्याय हक्कासाठी आपल्याला त्याची पर्वा नाही आपण लढत राहू. आपल्याला जर आपले हक्क अबाधित ठेवायचे असतील तर.... 'अधिकार की लडाई में निमंत्रण नहीं भेजे जाते, जिसका जमीर जिंदा है वो खुद समर्थन में आ जाते हैं, हमारे हक पर जहां आँच आए टकराना जरूरी है,

और तुम जिंदा हो, तो जिंदा नजर भी आना जरूरी है' या शायरीतील पंक्तीतून उपस्थित ओबीसी बांधवांना आवाहन केले.

यावेळी उपस्थित ओबीसी बांधवांसमोर ते पुढे म्हणाले की, आपल्यातील मतभेद बाजूला ठेवून ओबीसी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सर्वांनी बहुसंख्येने एकत्र यायला हवं. त्यासाठी कुणाचीही वाट न पाहता एकत्र येऊन गावागावात बैठका घ्या, सभा घ्या आणि एकत्र येऊन ओबीसींचा आवाज बुलंद करा असे आवाहन त्यांनी उपस्थित बांधवांना केले.

ते म्हणाले की, मराठा आरक्षणाला आपला विरोध नाही मात्र राज्यात मराठा कुणबीच्या नावाखाली चुकीच्या पद्धतीने दाखले वाटले जाताय ते सर्व दाखले तातडीने रद्द करा. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी जी शिंदे समिती नेमण्यात आली आहे ही समिती देखील बरखास्त करून मराठा समाजाच मागासलपण शोधण्याची गरज आहे. त्यासाठी निरगुडे आयोगाने केवळ मराठ्यांचे सर्वेक्षण न करता महाराष्ट्रातील सर्व जातींचे सर्वेक्षण करून त्यांचं मागासलेपण शोधण्याची गरज आहे. तेव्हाच सर्वांना न्याय मिळेल. त्यामुळे मराठा समाजाच एकट्याच सर्वेक्षण नको, सर्व समाजाचे सर्वेक्षण करा असे आवाहन त्यांनी केलं.

ते म्हणाले की, भारतीय राज्यघटनेने सर्वांना देशात सर्वत्र फिरण्याचा अधिकार दिला आहे. बोलण्याचा अधिकार आणि स्वातंत्र दिले आहे. यामुळे कोणाला गावबंदी करता येऊ शकत नाही. गावबंदी केली तर एका महिन्याची शिक्षा करण्याची तरतूद आहे. ज्यांनी गावबंदीचे बोर्ड लावले त्यांना एका महिन्याच्या शिक्षा करा. आता सरकार कायद्याप्रमाणे कारवाई करणार आहे की नाही? पोलीस हे करणार आहे की नाही? राज्यात सर्वत्र लावलेले गावबंदीचे बोर्ड काढा. पोलिसांनी राज्यघटनेप्रमाणे कारवाई करावी, असा हल्लाबोल ओबीसी नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ आपल्याच सरकारवर केला. तसेच राजेश टोपे, रोहित पवार यांचे तुम्ही स्वागत करतात. त्यांच्यासाठी गावबंदी नाही, परंतु आमच्या नेत्यांना गावबंदी केली जात आहे, अशी खरमरीत टीका केली. ते म्हणाले की, राहुल गांधी देशात जातीय जनगणनेची मागणी करत आहे. इतर पक्षातूनही ही मागणी पुढे येत आहे. मग एकादाची जातीय जनगणना करा आणि 'दूध का दूध पानी का पानी' होऊन जाऊ द्या. मग समजणार कोण मागास आहे. बिहार करु शकतो तर महाराष्ट्र का करु शकत नाही. जनगणनेत जे येईल, ते मान्य करायला आम्ही तयार आहोत, असेही छगन भुजबळ यावेळी म्हणाले. या सभेच्या पूर्वी मंत्री छगन भुजबळ यांच्यासह सर्व उपस्थित ओबीसी बांधवांनी सव्वीस अकरा हल्ल्यात शहीद झालेल्या सर्व वीर जवानांना आदरांजली अर्पण केली.

# यांका कुपाला स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ग्रोडणा, ब विद्यापीठाबरोबर 'संदीप यूनिव्हर्सिटी' चा शैक्षणिक करार

**नाशिक । प्रतिनिधी**



संदीप फाऊंडेशन आणी संदीप यूनिव्हर्सिटीने यांका कुपाला स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ग्रोडणा, बेलारूस सोबत शैक्षणिक करार केला आहे. या करारामुळे नाशिकमधुन आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे दारे खुली झाली आहेत. यांका कुपाला स्टेट युनिव्हर्सिटी ऑफ ग्रोडणा, बेलारूस हे एक नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आहे. विद्यापीठाबरोबर केलेल्या करारामुळे स्टुडंट्स आणि स्टाफ एक्सचेंज प्रोग्राम, पदवी तथा पदव्यूत्तर अभ्यासक्रम , पीएच.डि मार्गदर्शन, जॉईंट रिसर्च अँड पब्लिकेशन्स, जॉईंट इंडो बेलारुसियन फंडेड प्रोजेक्ट अशा अनेक संयुक्त अभ्यासक्रमाचा व प्रोजेक्ट चा समावेश करण्यात येणार आहे . या करारावर सही करण्यासाठी यांका कुपाला बेलारुसियन विद्यापीठाकडून २ सदसिय टीम उपस्थित होती. सदर करारावर यांका कुपाला बेलारुसियन विद्यापीठाचे डॉ ऍना कार्कनिस्ता, हेड ऑफ मॉडर्न प्रोग्रामिंग अँड टेक्नॉलॉजिस व डॉ आंतोन हलझेऊ हेड ऑफ रिसर्च डिपार्टमेंट, व संदीप फॉउंडेशन चे डॉ. दीपक पाटील आणि संदीप विद्यापीठातर्फे डॉ राजेंद्र सिन्हा यांनी या करारावर स्वाक्षरी केली. डॉ. संदीपकुमार झा चेअरमन संदीप फॉउंडेशन यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# आम आदमी पार्टीचा ११ वा वर्धापन आणि संविधान दिवस 'आप' कडून साजरा



**नाशिक । प्रतिनिधी**

आम आदमी पार्टीतर्फे पक्षाचा अकरावा वर्धापन दिन आणि भारतीय संविधान दिन मोठया उत्साहाने साजरा करण्यात आला. पक्षातर्फे जनतेला आणि विविध स्तरातील लोकांना पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त आमंत्रण देण्यात आले होते. आम आदमी पार्टी तर्फ नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये सकाळी ९.३० वाजता रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना खिचडी आणि बुंदी वाटप करण्यात आली. त्यानंतर आपच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

जनतेच्या सहभागाने निर्माण झालेल्या आणि जनतेचे कल्याण करणाऱ्या 'आम आदमी पार्टी'चा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी हुतात्मा स्मारक येथे शहीद दिनानिमित्त शहिदांना श्रद्धांजलीही अर्पण करण्यात आली. तसेच वर्धापन दिनाचे निमित्त साधून आम आदमी पार्टी नाशिकचा हेल्पलाइन नंबर मोबाईल ९२५६५६५००३ सुद्धा जनसेवेसाठी जाहीर करण्यात आला. त्यानंतर दुपारी अल्पोउपहारचा कार्यक्रम पार पडला.

ह्यावेळी संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, पदाधिकारी गिरीश उगले पाटील, योगेश कापसे, स्वप्निल घिया, गोसिया शेख हसन, नुतन कोरडे, अमित यादव, विकास पाटील, प्रदीप लोखंडे, दिपक सरोदे, अभिजीत गोसावी, अमर गांगुर्डे, गोरख मोहिते, बाळासाहेब बोडके, आशिष खंडिझोड, माजिद पठाण, पदमाकर अहिरे, रमेश पाटील, कलविंदर गरेवाल, सुमीत शर्मा, शकील शेख आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

**मालेगाव ।** लाल शहर व परिसरात अवकाळी पावसाने सायंकाळी जोरदार हजेरी लावली. रात्री नऊ नंतर देखील मुसळधार पाऊस झाला. जोरदार पावसामुळे कांद्याचे नुकसान झाले. अनेक भागातील खंडित झालेले वीज पुरवठा रात्री उशिरापर्यंत सुरू झालेला नव्हता. शहर व ग्रामीण भागात दिवसभरापासून ढगाळ वातावरण होते. सायंकाळी अचानक आलेल्या पावसामुळे अनेकांची धावपळ उडाली. शहरातील झोपडपट्टी व सखल भागात ठिकठिकाणी पाण्याचे डबके साचले. अवकाळी पावसामुळे ग्रामीण भागात कापूस, मका, कांदा यांचे नुकसान झाले. शहर व तालुक्यात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसात जोरदार वारा असल्याने झोपडपट्टीतील अनेक घरांचे पत्रे उडाले. पाऊस सुरु होताच शहरातील सर्व भागातील वीज काही तास गायब होता.

### कथा मैदानाची स्वच्छता करा

**नाशिक ।** लाखो भाविकांच्या उपस्थितीत पाथर्डी भागात पार पडलेल्या पंडित प्रदीप मिश्रा यांच्या श्री शिवमहापुराण कथेनंतर आता या सुमारे ६० ते ७० एकर मैदानाची स्वच्छता तातडीने करण्याचे आव्हान संयोजकांपुढे आहे.थोडा पाऊस पडल्याने ज्या भागात चारशेपेक्षा अधिक संख्येने शौच कुपिका ठेवण्यात आलेल्या होत्या त्या भागात मोठी दुर्गंधी पसरल्याने तातडीने येथील स्वच्छता करून संपूर्ण परिसर निर्जंतुक करण्याची मागणी आसपास राहणाऱ्या नागरिकांनी केली आहे.

# न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेतर्फे संविधान दिनानिमित्त संविधान वाचन

**नाशिक । प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टी व न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुनाताई घुगे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी दिव्यांग विकास आघाडीचे नेते बाळासाहेब घुगे यांनी संविधान वाचन केले. यावेळी प्रदिप केकाणे, बाळु शेवाळे, सुरज वाजे, आरती खैरनार, नीता मिश्रा, विद्या जोशी, शारदा शर्मा, पुजा शेवाळे, दिनकर चोथे, पुष्पा वाजे यांच्यासह परिसरातील दिव्याग बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन दिव्यांग आघाडीचे बाळासाहेब घुगे यांनी केले होते.

# प्रथमच इंदिरानगरला श्री हरिहर भेट सोहळा उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**





शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख देवानंद बिरारी यांच्या संकल्पनेतून कार्तिक पौर्णिमेला श्री महादेव आणि श्री विष्णू भगवान यांच्या भेटीचा श्री हरिहर भेट सोहळा प्रथमच इंदिरानगर भागात सुरू करण्यात आला. नाशिकमध्ये केवळ सुंदर नारायण मंदिरात हा पारंपरिक सोहळा साजरा करण्यात येत असतो. येथे होणाऱ्या प्रचंड गर्दीमुळे अनेक सिडको व इंदिरानगरवासिय या सोहळ्यास मुकतात. ही बाब लक्षात घेत शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख देवानंद बिरारी यांनी हा सोहळा इंदिरानगर परिसरात सुरु करण्यासाठी पाऊल उचलले असून दरवर्षी हरिहर भेट सोहळा राबविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

महादेव मंदिरातून पालखी मिरवणुकीद्वारे निघणारे महादेव भगवान विष्णूच्या मंदिरात जातात आणि सोबत नेलेले बेल तेथे अर्पण केले जाते. तेथून तुळशीची माळ घेऊन ती परत महादेव मंदिरात आणून महादेवाला अर्पण केली जाते. अशा स्वरूपात हा सोहळा पार पडतो . ओम नमो सद्गुरू सदसंन्यासी आखाडा ट्रस्टचे प्रमुख प्रवीणनाथ महाराज आणि डमरू प्रचारक श्री स्वपथयात्री यांची प्रमुख उपस्थिती होती. श्रद्धा विहार येथील समादेशवर महामंड महादेव मंदिरापासून पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. चेतनानगर येथील दास मारुतीची भेट घडवून आणल्यानंतर येथील श्रीकृष्ण मंदिरात ही पालखी मिरवणूक आली. मिरवणुकीदरम्यान आकर्षक डमरू वादन करण्यात आले. माजी नगरसेवक अमोल जाधव आणि संगीता जाधव यांनी पालखीचे स्वागत केले. श्री विष्णू भगवान यांना बेलपत्र वाढवून आणि तेथील तुळशीची माळ घेत किशोरनगर मार्गे राजीवनगर येथील कानिफनाथ मंदिर, वडाळा पाथर्डी रस्त्याने गजानन महाराज मंदिरमार्गे पुन्हा समाधेश्वर मंदिरात मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. माजी नगरसेविका वंदना बिरारी, उपमहानगर प्रमुख निलेश साळुंखे, विभाग प्रमुख विनोद दळवी, सागर देशमुख, राजू कदम, दीपक केदार, रवींद्र गामणे, महेश चव्हाण आदींनी संयोजन केले.ढोल ताश्यांच्या गजरासह फटाक्यांच्या आतषबाजीत इंदिरानगर वासियांनी या सोहळ्याचे स्वागत केले.


**प्रोसेस जमा** **ॲड. संतोष टी. मिसाळ**
**नि.६**

## जाहीर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. १३५७ / २०२३**

१. यमाजी कुसाजी दहिहंडे (गवळी) उ.व.-६०वर्षे, धंदा-मजुरी
रा. झोपडपट्टी, एसटी स्टॅण्ड जवळ, चाळीसगाव, ता.चाळीसगाव, जि.जळगाव
२. भटु कुसाजी गवळी ( दहिहंडे) उ.व.-५२ वर्षे, धंदा-मजुरी
रा. लळींग, ता. जि. धुळे
३. बारकु कुसाजी दहिहंडे (गवळी) उ.व.-४६ वर्षे, धंदा-मजुरी
रा. लळींग, ता. जि. धुळे
४. अनिता नागेश दहिहंडे (गवळी) उ.व.-४५ वर्षे, धंदा-घरकाम
५. राहुल नागेश दहिहंडे (गवळी) उ.व.-३० वर्षे, धंदा-मजुरी
नं. ४ व ५ रा. लक्ष्मी नगर, राठोड हॉस्पीटल, गवळी वाडा, एसटी स्टॅण्ड मागे, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव
६. ज्योती मंगेश गवळी उ.व.-२७ वर्षे, धंदा-घरकाम
रा. नवेगाव, सायगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव
७. सरूबाई बाबुराव बिडकर (गवळी) उ.व.-७५वर्षे, धंदा-घरकाम
रा.जुना नाका, हिरापुर रोड, चाळीसगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव
८. पारूबाई बाबुराव गवळी उ.व.-६२ वर्षे, धंदा-घरकाम
रा. यमुना भवन, गांधी चौक, गवळी वाडा, मनमाड, ता. नांदगाव, जि.नाशिक .....**अर्जदार**

**विरूध्द**

**कुणीही नाही** ...**सामनेवाला**

कै. कुसाजी गजमल गवळी (दहिहंडे)
कै. बबनबाई कुसाजी गवळी
कै. नागो उर्फ नागेश कुसाजी गवळी (दहिहंडे) ...**मयत**

बॉम्बे रेग्युलेशन कायदा तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. कुसाजी गजमल गवळी (दहिहंडे) यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकरीता सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश साो. (व. स्तर) यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौकशी तारीख दि. २९/१२/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश साो. (क.स्तर) कोर्ट नं. ५ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै.कुसाजी गजमल गवळी (दहिहंडे) यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. २४/११/२०२३ आदेशावरून

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, धुळे** **दिवाणी न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### दोंडाईचात संविधान दिनानिमित्त अभिवादन

**दोंडाईचा ।** येथील रमाईनगरात जागतिक संविधान दिवस साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दरम्यान, संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. मुंबईवर झालेल्या २६ / ११ या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. अक्षय चव्हाण यांनी संविधानाचे प्रास्ताविक सादर केले. अण्णा सुतारे, जितेंद्र खंडाळे, अजय सुधारे, ललित खंडाळे, गणेश काकडे, आदी समाजबांधव उपस्थित होते.

### शेतकऱ्याकडे चोरी; दागदागिने लंपास

**धुळे ।** दोंदवाड (ता. धुळे) येथील शेतकरी तथा सेंट्रिंग कामगार भाऊसाहेब चिंतामण कोळी यांच्याकडे चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी केली. घरातून २२ हजार १५० रुपयांचे चांदीचे दागिने, २३ हजारांचे सोन्याचे जोड, मंगळसूत्र असा ४५ हजार १५० रुपयांचा ऐवज नेला. १४ नोव्हेंबरला दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली. याबाबत माळी यांनी धुळे तालुका पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल झाला.

# अवकाळीने शेतकऱ्यांची दाणादाण; वीज पडून २० ट्रॅक्टर मक्याचा चारा खाक

**साक्री । प्रतिनिधी**

रविवारी विजांचा कडकडाट आणि अवकाळी पावसामुळे साक्री तालुक्यातील शेतकऱ्यांची दाणादाण उडाली असून, दिघावे (ता. साक्री) येथे वीज पडून दुभत्या जनावरांसाठी विकत घेतलेला सुमारे २० ट्रॅक्टर मक्याचा (कडबा) चारा जळून खाक झाला आहे.

पै-पै जमवत दुभत्या जनावरांसाठी विकत घेतलेला चारा दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर जळून खाक झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे.दुपारी चारच्या सुमारास विजांच्या कडकडाटात दिघावे परिसरात पाऊस झाला. दिघावे येथील पाडगण शिवारात आप्पा चिंधा गोयकर यांनी शेणपूर, मलांजन, उंभरे, उंभरटी, प्रतापपूर आदी ठिकाणच्या शेतकऱ्यांकडून विकत घेत चारा आणला होता.

दुपारी पावसाबरोबर कोरड्या चाऱ्यावर वीज पडल्याने आग लागली. भरपावसात आगीने रौद्र रूप धारण केले. श्री. गोयकरांसह लगतच्या शेतकऱ्यांनी आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. तोपर्यंत चारा जळून भस्मसात झाला होता. यंदा अल्प पावसामुळे साक्री तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती आहे. अल्प पावसामुळे खरीप पिके केवळ तग धरून उभी होती. खरीप हंगाम जेमतेम हाती आल्याने चाराही फारसा हाती येऊ शकला नाही. उन्हाळ्यात चाऱ्यासाठी भटकंती नको म्हणून पशुपालक इकडून तिकडून कोरडा चारा आणून संग्रही करून ठेवत आहेत. दिघावे येथील आप्पा चिंधा गोयकर यांनीदेखील दुभत्या जनावरांसाठी चारा संग्रही ठेवला होता. चाराटंचाईमुळे चाऱ्याचे दर गगनाला भिडले आहेत. पण जनावरांसाठी चारा शोधणेही अवघड होत असल्याचे पशुपालकांचे म्हणणे आहे.

### ...आग विझविण्यासाठी धावाधाव!

रिपरिप पावसाबरोबरच मक्याच्या (कडबा) चाऱ्यावर वीज पडल्याने आग लागली. भरपावसात लागलेली आग पाहून लगतच्या शेतकऱ्यांनी ती विझविण्यासाठी धावाधाव केली. आप्पा चिंधा गोयकर यांच्यासह काळू गोयकर, सुकलाल गोयकर, धुडकू टकले, काशीराम गोयकर, उपसरपंच नामदेव टकले, सोनू टकले, भिका गोयकर आदींनी धाव घेत मिळेल त्या साधनातून पाणी आणत आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.



### साक्री तालुक्यात गारपीट

तालुक्यातील साक्री, माळमाथा व काटवान परिसर तसेच पश्चिम पट्ट्यातील अनेक भागांत रविवारी बिगरमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावत चांगलाच तडाखा दिला. अनेक ठिकाणी तर गारपीटदेखील झाली असून, तिचा शेतकऱ्यांना फटका बसण्याची शक्यता आहे. काही दिवसांपासून वातावरणातील बदलामुळे पावसाची शक्यता वर्तविण्यात येत होती. यातच सकाळपासून ढगाळ वातावरणामुळे पाऊस बरसतो की काय असे वाटत असताना दुपारपासून शहरासह परिसरात पावसाला सुरवात झाली. चारनंतर तर या पावसाने आणखी जोर पकडत जोरदार बरसायला सुरवात केली. काही काळ गारपीटदेखील झाली. साक्रीसोबतच म्हसदी, कासारे परिसर, माळमाथा परिसरातील अनेक भागातदेखील पावसाने हजेरी लावली असून, या सर्वच भागात तुरळक गारपीटदेखील झाली.

### मुसळधारेने शिरपूरला झोडपले गारपिटीमुळे पिकांचे नुकसान

**शिरपूर ।** शहर व परिसराला रविवारी मुसळधार पावसाने झोडपून काढले. दोन तास विजांच्या कडाकडाटासह झालेल्या पावसाने शहरातील उंचसखल भागात पाणी साठले आहे. पावसामुळे गारठ्यातही वाढ झाली आहे. उशिरापर्यंत वीज गुल झाली. रविवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारी बारापासून पावसाचे थेंब पडण्यास सुरवात झाली. एकपर्यंत तुरळक स्वरूपात पाऊस सुरू होता. दीडनंतर पावसाने रौद्र रूप धारण केले. मुसळधार सरी बरसल्याने बाजारपेठेत एकच धावपळ उडाली. फेरीवाल्यांसह ग्राहकांनी मिळेल तेथे आश्रय घेतला. दुपारी तीनपर्यंत पावसाचा धुमाकूळ सुरूच होता. अंधारलेल्या वातावरणात विजांचा लखलखाट अधिकच भीती निर्माण करीत होता. पावसामुळे शहरातील ओपन स्पेसमध्ये सखल भागात तळे साठले आहे. शेतांमध्ये कापसाची वेचणी सुरू असतानाच पावसामुळे शेतकरी व मजुरांची तारांबळ उडाली. विजांच्या कडकडाटामुळे त्यांनी जवळच्या झोपड्यांमध्ये, झाडाखाली आश्रय घेतला. तालुक्यात बहुतांश शेतांमध्ये कापूस काढल्यानंतर हरभरा पेरणीची तयारी सुरू आहे. दरम्यान, तालुक्यात पावसामुळे हानीचे वृत्त अद्यापपर्यंत नाही.

### पश्चिम पट्ट्यात बिगरमोसमी पावसाची जोरदार हजेरी

पिंपळनेरच्या पश्चिम पट्ट्यात दुपारी साडेबारापासून पूर्णपणे ढगाळ वातावरण झाले. तुरळक पावसाने सुरवात होऊन थंड वातावरण होऊन गारठा निर्माण झाला आहे. नंतर वादळी वाऱ्यासह धुके निर्माण होऊन विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरवात झाली. या बिगरमोसमी पावसामुळे शेतकऱ्यांचे भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. उन्हाळ कांदा रोपांचे नुकसान व ज्या शेतकऱ्यांनी मसूर, वाटाणा, हरभरा व गव्हाची पेरणी केली असेल तर तेही या बिगरमोसमी पाण्याने धोक्यात आल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. परिसरातील शेतकऱ्यांची नागली, बाजरी, सोयाबीन खळ्यात उडवे करून ठेवलेले पीक व गुरांचा चारा या अवकाळी पावसाने खराब होण्याची शक्यता आहे.

### कांदा, हरभरा पिकांवर कीडरोगाचा प्रादुर्भाव वाढणार

**दोंडाईचा ।** परिसरात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील कांदा, हरभरा पिकांवरती कीडरोगाचा प्रादुर्भाव वाढणार आहे. शेतकरी चिंतेत सापडला आहे. दरम्यान, पशुपालकांच्या जनावरांच्या चाऱ्याचे नुकसान झाले आहे. रविवारी सकाळपासून ढगाळ वातावरण होते. सायंकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे सर्वत्र शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. रात्री उशिरापर्यंत पावसाची रिपरिप सुरू होती. त्यामुळे वातावरणात चांगलाच गारठा वाढला आहे. शहरातील ब्राह्मणे रस्त्यावरील लाल मिरचीच्या पथारीवरील व्यापाऱ्यांची धावपळ उडाली. दिवाळीनंतर वीटभट्टी लावलेल्या व्यावसायिकांनाही बिगरमोसमी पावसाचा फटका बसला आहे.

### जेबापूरला शाळेचे पत्रे उडाले

अवकाळी पावसाने हजेरी लावली. पावसामुळे रब्बीच्या पिकांना फायदा होणार असला तरी शेतात असलेल्या काढलेल्या भात पिकाचे नुकसान होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. जेबापूर (ता. साक्री) येथे वादळी पावसामुळे जिल्हा परिषद शाळेचे उडालेले पत्रे उडाले. शरासह परिसरात विविध ठिकाणी दुपारी एक ते दीडच्या सुमारास विजांच्या गडगडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली. अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. काढणीला आलेल्या भात पिकाचे व नुकत्याच लावण्यात आलेल्या कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याचीदेखील भीती व्यक्त करण्यात येत आहे. पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत होते.

## निसर्गमित्र समितीतर्फे २६-११ च्या शहिद जवानांना अभिवादन

**धुळे । प्रतिनिधी**




महाराष्ट्र शासन छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त निसर्गमित्र समितीच्या वलवाडी स्थित कार्यालयात मुंबई येथे झलेल्या दहशतवादी हल्ल्या प्रसंगी दहशतवाद्यांशी लढतांना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहिद वीर जवानांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, राज्य महासचिव संतोषराव पाटील, धुळे जिल्हा कार्याध्यक्ष तथा राष्ट्रवादी शिक्षक सेल चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र देविदास भदाणे, जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य आर ए पाटील, माजी सैनिक मुरलीधर बाविस्कर, अवधान येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शांकीलाल ठाकरे, धुळे शहराध्यक्ष प्रा एच ए पाटील,धुळे तालुका संपर्क कांतिलाल देवरे, धुळे शहर प्रमुख वैभव पाटील, कार्यालय प्रमुख निसर्ग अहिरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला निसर्गमित्र समितीचे निवडक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित हेते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निसर्ग सुत्रसंचालन राज्य महासचिव संतोषराव पाटील यांनी केले अशी माहीती निसर्ग मित्र समिती चे संस्थापक प्रेमकुमार अहिरे व जिल्हा अध्यक्ष डी बी पाटील यांनी पत्रकॉन्वये दिली आहे.



## अंबिका नगर परिसरात रस्ता व गटार क्रॉंकिंटीकरण करा


**नागरिकांची आमदार आ. शाह यांच्या कडे मागणी**

**धुळे ।** शहरातील वार्ड नं. १९ सर्व्हे नं ४११/१+३ अंबिका नगर मस्जिदे इबराहिम जवळ निसार भाई यांच्या घरा पासुन ते जिशान भाई व पत्रकार सैफुररहेमान यांच्या घरा पर्यंत रस्ता क्रॉंकिंटीकरण व गटार कॉंक्रीटीकरण करण्यात यावे अशी मागणी धुळे शहर आमदार फारूक शाह यांच्या कडे केली आहे यावेळी पत्रकार सैफुररहेमान अन्सारी, जिशान काझी, निसार अन्सारी, पीरन शाह मुन्नवर, जुनैद शेख आदी उपस्थित होते.

## एक शाम काटू के नाम कार्यक्रमाला उसळली दोंडाईचा शहरातील जनता

**सिंधी कॉलनीत राबविलेल्या कार्यक्रमाला नागरिकांची पसंती**

**दोंडाईचा । प्रतिनिधी**



येथील सिंधी कॉलनीमधील भगवान श्री शामप्रेमी परिवार-तरूणांच्या ग्रुपने दैनंदिन जीवनात येणाऱ्या व्यापार-व्यवसाय-कुटूंबातील तणावातून प्रत्येकाने चिंताग्रस्त न होता, बाहेर पडावे व जीवन जगण्याचा उद्देश लक्षात घेऊन,त्याचा आस्वाद घेत भगवान श्री शाम-मुरलीमनोहर यांच्या मार्गावर चालावे म्हणून सिंधी कॉलनीतील गोधळीवाला आश्रम येथे २५ नोव्हेंबर शनीवार रोजी रात्री हारे का सहारा बाबा शाम हमारा.. असे म्हणत एक शाम काटू वाले के नाम ह्या कार्यक्रमाची वाट्सप, फेसबुक ह्या समाज माध्यम मार्फत खुप कमी वेळात प्रसिद्धी मिळवली. तसेच यावेळी सदर कार्यक्रमाला भगवान श्री शाम-मुरलीमनोहर परिवार भक्तांनी,व गावातील वेगवेगळ्या समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत,भजन-किर्तन कार्यक्रमांचा पहाटे साडेतीन वाजेपर्यंत मनमुराद आस्वाद घेतला आहे.

यावेळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाम प्रेमी मंडळ-परिवाराचे राजेससेठ, अजय दोधेजा, सुनील रूपचंदानी,विनीत मनचंदानी,राहूल राजानी, नितीन राजानी, मोहीत राजानी, विवेक केसवानी, इंधर रोहीजा,मोनू जयसिंगाणी, शंकर राजपाल,प्रितम राजपाल, सोनू माखीजा, खुशाल रूपचंदानी, सौरव दोधेजाआदी शामप्रेमींनी विशेष परिश्रम घेतले आहे.

## टेंभे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**होळनांथे । प्रतिनिधी**



टेंभे ता. शिरपूर येथे भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृती व उत्सव समितीच्या वतीने २६ नोव्हेंबर, संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करुन आदरांजली वाहण्यात आली.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलकाजवळ आयोजित सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तदनंतर संविधान उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. याप्रसंगी समिती सचिव आयु.अजय नवल कढरे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन व संविधानाचे महत्व आपल्या मनोगतातून व्यक्त केलेत.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृती व उत्सव समिती अध्यक्ष निलेश कढरे, समिती उपाध्यक्ष सुरेश कढरे, सचिव अजय कढरे, गोपीनाथ बागुल, गोकुळ कढरे, आरव कढरे, भिमा, बाळा कढरे, फाईट्या पावरा आदी उपस्थित होते.

### दुचाकी घसरून तरुणाचा मृत्यू

**धुळे ।** शहरातील देवपूरमधील एका बिअरबारसमोर रस्त्यावर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात गंभीर जखमी होऊन तरुणाचा मृत्यू झाला. आसिफ जोयोद्दीन शेख असे त्याचे नाव आहे. देवपूरमधून दुचाकीने घरी येण्यास निघाला. यादरम्यान अंडाकृती बगिचा परिसरात दुचाकी घसरून झालेल्या अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यास नागरिकांनी खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असताचा त्याचा मृत्यू झाला.

## एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संविधान दिन साजरा

**शिरपूर । प्रतिनिधी**



एच. आर. पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २६ नोव्हेंबर २०२३ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला.

श्रीमती शीला चौधरी यांनी संविधानाचे महत्त्व व संविधान निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य आर.बी.पाटील यांनी देशाच्या जडणघडणीत संविधानाचे असलेले महत्त्व स्पष्ट केले. उपस्थित सर्व विद्यार्थिनी व एन.एस.एस. च्या विद्यार्थिनींनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

## पालकमंत्री भुसेंकडून नुकसानग्रस्त भागांची पाहणी; पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना

**नाशिक । प्रतिनिधी**



जिल्ह्यात रविवारी दुपारनंतर गारपीटीसह अवकाळी पावसामुळे द्राक्ष पिकासह कांदा, ऊस, टोमॅटो, फळबागा, पालेभाज्या आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे येत्या दोन दिवसांत पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी अधिकार्यांना दिले.

निफाड तालुक्यातील कसबे सुकेणे येथे पालकमंत्री दादा भुसे यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकर्यांच्या पिकांच्या नुकसानीची शेतात जाऊन पाहणी केली. यावेळी भुसेंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांना धीर दिला. तसेच अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतीचे तात्काळ वस्तुनिष्ठ पंचनामे येत्या दोन दिवसांत पूर्ण करण्यात यावेत, असे त्यांनी सांगितले. तसेच ज्या शेतकर्यांनी पीकविमा काढला असेल, त्या शेतकर्यांनीही झालेल्या नुकसानीबाबत पीकविमा कंपनीकडे नोंदणी करण्याचे आदेश अधिकार्यांना दिले. याशिवाय कोणीही आपत्तीग्रस्त नुकसानीच्या मदतीपासून वंचित राहू नये, तसेच नुकसानग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री भुसे यांनी शेतकर्यांना अश्र्वासित केले. दरम्यान, यावेळी आमदार दिलीप बनकर, माजी आमदार अनिल कदम, निफाडच्या उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, तहसिलदार शरद घोरपडे, उपविभागीय कृषी अधिकारी संजय सुर्यवंशी, यांच्यासह अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

निफाड तालुक्यात काल दुपारनंतर अचानक ढगांची गर्दी दाटुन येऊन वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास काही क्षणात निसर्गाने हिरावून घेतला. यात द्राक्ष उत्पादकांसह कांदा व इतर पिकांचे उत्पादन घेणाऱ्या लाखो शेतकऱ्यांचे कधीही न भरून येणारे कोट्यावधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. लाखो रुपयांचे कर्ज काढून उभे केलेले द्राक्षपिक अगदी क्षणात जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांनी एकच हंबरडा फोडला. या घटनेने संपूर्ण 'द्राक्षपंढरी' हादरून गेली आहे. पोटच्या पोराप्रमाणे जीव लावलेल्या पिकाची अशी क्षणात वाताहात होणे ही मनाला सुन्न करणारी घटना काल निफाड तालुक्यात घडली. निसर्गापुढे हतबल झालेल्या गारपीटग्रस्तांना धीर देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे, आमदार दिलीप बनकर, माजी आमदार अनिल कदम यांच्यासह आदी प्रशाकीय अधिकाऱ्यांनी निफाड तालुक्यातील कसबे सुकेणे येथील संतोष देवराम भंडारे,भारत राजाराम मोगल यांच्या द्राक्षबागांची तर महेश भंडारे यांच्या कांदा पिकाची पाहणी करत इतर घटनास्थळी धाव घेतली.

## एस. व्ही. के. एम. अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे येथील एस.व्ही.के.एम. अभियांत्रिकी महाविद्यालयात यांत्रिकी विभागाच्या वतीने ३ डी मॉडेल डिझायनिंग आणि प्रिंटिंग या विषयावर आधारित एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मधील ७ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. स्कूल मधील तरुण नवोदितांना ३ डी मॉडेलिंग आणि प्रिंटिंगच्या जगात, तंत्रज्ञानाच्या आकर्षक क्षेत्राचा शोध घेण्याचा अनुभव मिळाला. तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाने त्यांचा सर्जनशील प्रक्रियेत समावेश झाला. त्यांच्या कल्पनांना अत्याधुनिक ३ डी प्रिंटिंग तंत्रज्ञानाद्वारे अद्ययावत माहिती मिळाली. डॉ. अमोल बडगुजर व प्रा. योगेश सोनावणे यांनी ३ डी मॉडेल डिझायनिंग आणि प्रिंटिंग या विषयाची मूलभूत माहिती, उत्पादन क्षेत्रात त्याचा विविध वापर, उत्पादन क्षेत्रात वापरण्याचे वेगवेगळे मार्ग ह्या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती देऊन प्रात्यक्षिक करून दाखवले तसेच सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला प्राचार्य डॉ. निलेश साळुंके, असि. रजिस्ट्रार प्रा.अनमोल सूर्यवंशी, यांत्रिकी विभाग प्रमुख डॉ.हितेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अमोल बडगुजर, प्रा. योगेश सोनावणे, महेंद्र पाटील यांचे सहकार्य लाभले.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक
मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २०२३





# ‘अवकाळी’ची हंगामाला ’कळ’; गारपिटीमुळे शिवाराला ’झळ’!

## बागायती पिकांना फटका, कडब्याचे नुकसान, शेतात साचले पाणी













धुळे।
हवामान विभागाने तीन दिवस विविध भागात अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. तो खरा ठरला असून जिल्ह्यात धुळे शहरासह शिरपूर, शिंदखेडा, साक्रीसह ठिकठिकाणी पावसाने हजेरी लावली. शिरपूर शहरासह परिसरात दोन तास अवकाळी पाऊस कोसळला. तर पिंपळनेर, देऊर, म्हसदी, नेर, कुसुंबा आदी परिसरात जोरदार तडाखा दिला. यामुळे शेतशिवारात पाणी साचले असून बागायती पीक क्षेत्राला फटका बसला. धुक्यामुळे कांद्यावर करपा पडून नुकसानीची भीती व्यक्त होत आहे. सोमवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. शेतकऱ्यांना गारपिटीपासून पिकांना वाचवण्यासाठी काळजी घेण्याचं आवाहन हवामान विभागानं केलं होतं. तरी मात्र अवकाळी पावसामुळे काही भागात चांगलीच त्रेधातिरपीट उडाली. धुळ्यात दमदार हजेरी धुळे शहरात दिवसभर ढगाळ वातावरण होते. विजांच्या कडकडटासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे विक्रेत्यांची चांगलीच तारांबळ उडालेली होती. बळसाणे माळमाथा परिसर बळसाणेसह माळमाथा परिसरात विजांचा कडकडाट, वादळासह, पाऊस झाला. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास बळसाणे व परिसरात रिमझिम तर कुठे रिपरिप पाऊस कोसळला. बळसाणे, इंदवे, दुसाने, लोणखेडी, ऐचाळे, कढरे, हाट्टी, आगरपाडा, सतमाने आदी माळमाथा परिसरातील शेतातील पिकांचे नुकसान झाले.

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# पालकमंत्री भुसेंकडून नुकसानग्रस्त भागांची पाहणी

## पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या मंत्री भुसेंच्या सूचना
















नाशिक।
जिल्ह्यात रविवारी दुपारनंतर गारपीटीसह अवकाळी पावसामुळे द्राक्ष पिकासह कांदा, ऊस, टोमॅटो, फळबागा, पालेभाज्या आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे येत्या दोन दिवसांत पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे सार्वजनिक बांधकाम तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी अधिकार्यांना दिले. निफाड तालुक्यातील कसबे सुकेणे येथे पालकमंत्री दादा भुसे यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतकर्यांच्या पिकांच्या नुकसानीची शेतात जाऊन पाहणी केली. यावेळी भुसेंनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांना धीर दिला. तसेच अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतीचे तात्काळ वस्तुनिष्ठ पंचनामे येत्या दोन दिवसांत पूर्ण करण्यात यावेत, असे त्यांनी सांगितले. तसेच ज्या शेतकर्यांनी पीकविमा काढला असेल, त्या शेतकर्यांनीही झालेल्या नुकसानीबाबत पीकविमा कंपनीकडे नोंदणी करण्याचे आदेश अधिकार्यांना दिले. याशिवाय कोणीही आपत्तीग्रस्त नुकसानीच्या मदतीपासून वंचित राहू नये, तसेच नुकसानग्रस्तांना तात्काळ आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री भुसे यांनी शेतकर्यांना अश्र्वासित केले. दरम्यान, यावेळी आमदार दिलीप बनकर, माजी आमदार अनिल कदम, निफाडच्या उपविभागीय अधिकारी हेमांगी पाटील, तहसिलदार शरद घोरपडे, उपविभागीय कृषी अधिकारी संजय सुर्यवंशी, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार, कृषी पर्यवेक्षक प्रमोद पाटील, कृषी सहाय्यक योगेश निरभवणे यांच्यासह अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.